# फेर जाहीर निविदा

दिवाणी न्यायालय, देवगड येथिल जुन्या इमारतीचे लाकूड सामान सद्यस्थितीत न्यायालयाचे आवारात ठेवणेत आलेले असून त्यापासून कार्यालयीन उपयोगासाठी फर्निचर तयार करणेसाठी यापुर्वी ०२/०५/२०२४ अन्वये जाहीर निविदा मागविणेत आलेली होती. तथापि, सादर करण्यात आलेल्या सर्व निविदांमध्ये त्रुटी आढळल्याने फेर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | वस्तूचे नांव | नग संख्या | वस्तू तयार करण्यासाठी येणारा खर्च |
|---|---|---|---|
| १ | उपलब्ध लाकूड सामानामधील ६०% सामानापासून तयार करणेत येणारी लाकडी कपाटे | | |
| २ | उपलब्ध लाकूड सामानामधील २०% सामानापासून तयार करणेत येणारी लाकडी टेबले | | |
| ३ | उपलब्ध लाकूड सामानामधील २०% सामानापासून तयार करणेत येणा—या खुर्च्या | | |

## अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग मु.ओरोस यांचे नांवे असावे. सदर लखोटयावर ''लाकडी फर्निचर तयार करणेकरीता दरपत्रक'' असे नमूद असावे.

२) वर नमूद वस्तू कोणत्या साईजमध्ये तयार करता येतील त्याचे मापे निविदेसोबत सादर करणेत यावीत.

३) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमूद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवज तयार करणेकामी, दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, पासबुकची पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत व रद्द केलेला चेक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) जाहीर निविदेमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग—ओरोस यांचा राहील.

तरी इच्छुक कारागिर यांनी आपली दरपत्रके सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून दहा दिवसांच्या आत या कार्यालयाकडे सादर करावीत.

नेवुलावेत

दिनांक :— २४/०५/२०२४

सहायक अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग.

म.जा.क्र./ग्रंथा./२८९५ सन २०२४
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस.
दिनांक :— २४/०५/२०२४

प्रत माहितीसाठी व जरुरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर :—

१. मा.दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिंधुदुर्ग—ओरोस.
२. मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस.
३. मा.सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग—ओरोस.
४. मा.दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग ( ई—मेलद्वारे).
५. मा.जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस.( ई—मेलद्वारे).
६. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग—ओरोस.( ई—मेलद्वारे).
७. मा.जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस यांचे नोटीस बोर्डवर.
८. जिल्हा प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय,सिंधुदुर्ग—ओरोस यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.